# मुंबई विद्यापीठ

वि.वि.नि.वि/५/२०१९
फोर्ट, मुंबई – ३२
१६ जुलै, २०१९

परिपत्रकः–

महोदय/ महोदया,

रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील संलग्नित अनुदानित/विना–अनुदानित व कायम विना–अनुदानित महाविद्यालये/संस्था यांचे प्राचार्य व संचालक यांना कळविण्यात येते की, मुंबई विद्यापीठ व गोगटे जोगळेकर कला, वाणिज्य, महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने, शनिवार दिनांक २० जुलै, २०१९ रोजी सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत आर. पी. गोगटे कला व विज्ञान महाविद्यालय आणि आर व्ही. जोगळेकर वाणिज्य महाविद्यालय रत्नागिरी – ४१५ ६१२ या ठिकाणी **नविन शैक्षणिक धोरणाचा मसुदा (Draft of New Education Policy)** तसेच महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम कलम (९७) नुसार **महाविद्यालय विकास समितीबाबत एकदिवसीय** चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या चर्चासत्रामध्ये विविध मान्यवरांचे मार्गदर्शन होणार आहे.

सदर चर्चासत्र सर्व शिक्षकांसाठी खुले आहे. तरी रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या महाविद्यालयातील प्राचार्यांना कळविण्यात येते की, सदर चर्चासत्रास आपली उपस्थिती दर्शवावी व आपल्या महाविद्यालयातील किमान २ प्राध्यापकांना प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहण्यास नामित करावे. उपस्थित राहण्या-या प्राध्यापकांना एक दिवसाची कर्तव्य रजा (On Duty Leave) मंजुर करण्यात यावी.

मुंबई – ४०० ०३२
दिनांक – १६ जुलै २०१९

(डॉ. अजय देशमुख)
कुलसचिव

प्रत रवाना :–

प्राचार्य, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील संलग्नित अनुदानित/विनाअनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालये/संस्था यांच्या माहीती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

Rk/16719/4